सं.फौ.खटला क्र.७१/२४
सरकार / भानुदास मंडले
निशाणी क्र.१२

साक्षीदार क्र.१ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

| | |
|---|---|
| माझे नाव | – राहूल नारायण वाघमारे |
| वडीलांचे नाव | – नारायण राघू वाघमारे |
| वय | – ५७ वर्षे |
| व्यवसाय | – शेती |
| राहणार | – दिघंची, ता. आटपाडी, जि. सांगली. |

**<u>सरतपास सहा. सरकारी वकील श्री.बी.डी.काळे यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>**

१. पोलीसांनी मला पंचनाम्यावर सही करण्यासाठी आटपाडी पोलीस ठाणे येथे बोलावले होते. काय पंचनामा केला याची मला माहिती नाही. पंचनाम्यातील मजकूराविषयी मला माहिती नाही. आता मला पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर केवळ माझी सही आहे. परंतु त्यातील मजकूर मला माहिती नाही. पंचनाम्यावरील सहीस **<u>निशाणी क्र.PW1–13</u>** देण्यात येते.

**(साक्षीदार त्याचे पुर्व कथनांशी विसंगत उत्तरे देत असल्यामुळे सरकारी वकीलांना उलटतपासामध्ये विचारण्यात येतील अशा स्वरुपाचे प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात येते.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०२/०४/२०२३ रोजी मी

बनपुरी गावात जोतिबा मंदिराजवळ गावी पंचनामा करण्याकरीता गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्यासमक्ष पोलीसांनी देशी दारु ३ एक्स ९० मिली च्या २६ बाटल्या माझ्यासमक्ष जप्त केल्या. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष पोलीसांनी दिसल्या परिस्थितीप्रमाणे पंचनामा केला व मी त्यावर वाचून सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या परिचयाचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवण्यासाठी आजरोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. पी जी शिंदे यांनी नाकारला.**

समक्ष, श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ASHWINI JOTIRAM BACHULKAR

Digitally signed by ASHWINI JOTIRAM BACHULKAR
Date: 2025.09.20 11:27:21 +0530

आटपाडी. (अ. जो. बाचुळकर)

दिनांक : १७/०९/२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

आटपाडी

*****